**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 1960 चे कलम 88(1) अन्वये ओदश**

३३५
जाक्र.वि-4/पतसंस्था/क.88(1)/कै.भिदाप/2017
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (आउयो) कळवण
यांचे कार्यालय, कोल्हापूर फाटा कळवण
दिनांक -28/03/2017

**वाचावे- 1. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 88(1)**
**2. कै.भिला दाजी पवार ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था म.ता.कळवण या संस्थेचे दि.1.4.14 ते 31.3.16 या कालावधीचे लेखापरिक्षण व विशेष व प्रशासकिय अहवाल**

ज्याअर्थी उपरोक्त वाचावे अन्वये संस्थेचे दि.1.4.14 ते 31.3.16 या कालावधीचे वैधानिक लेखापरिक्षण झाले आहे.व त्यात आढळुन आलेल्या अपहार व गैरव्यवहार बावत संबधित लेखापरिक्षक सहकारी संस्था यांनी या कार्यालयास सादर केलेल्या विशेष व प्रशासकिय अहवालाची छाननी केली असता त्यामध्ये संस्थेच्या पदाधिका-यांनी ,व्यवस्थापक यांनी त्यांच्या पदाचा गैरवापर करुन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व नियम 1961 चे उल्लंघन करुन आर्थिक अपहार व अनियमितता करुन वर नमुद केलेल्या कालावधीत एकुण रु. 19875218/- ( अक्षरी रुपये एक कोटी अठयान्नव लाख पंचाहत्तर हजार दोनशे अठरा मात्र ) इतक्या रकमेचा अपहार करुन संस्थेच्या पैशाचा व मालमत्तेचा दुरुपयोग करुन संस्थेचा विश्वासघात केला आहे.

ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व नियम 1961 चे कलम 88 अन्वये लेखापरिक्षकाने दिलेल्या अहवालाच्या आधारे संस्थेच्या रचनेत किंवा व्यवस्थापनात जिने भाग घेतला होता अशा कोणत्याही व्यक्तीने किंवा संस्थेच्या कोणत्याही मृत किंवा माजी किंवा विद्यमान पदाधिका-याने / अधिका-याने अशा लेखापरिक्षणाच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी पांच वर्षाच्या कालावधीत संस्थेच्या कोणत्याही पैशाचे अपयोजन केले किंवा त्या संबधित तो उतराई झाला आहे किंवा संस्थेच्या बाबतीत कोणतेही अपकार्य किंवा विश्वासघात केल्याबद्दल तो दोषी झाला आहे याबद्दल निबंधकाची खात्री होईल तर निबंधकास किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस अशा व्यक्तींविरुध्द आरोप ठेवता येईल व आरोपाबाबत उत्तर देण्याची वाजवी संधी दिल्यावर निबंधक किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस या कलमानुसार ठरवतील त्या दराने जे व्याज होईल त्या व्याजासह तो पैशाची परतफेड करण्यास अशी रक्कम संस्थेस भरण्याविषयी आदेश देता येईल.

ज्याअर्थी संचालक मंडळाने व अधिकारी / कर्मचा-याने संस्थेचे कामकाज करतांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व नियम 1961 व संस्थेच्या मंजुर उपविधी या सर्वांचा भंग करुन अयोग्य कृती केलेली आहे हे लेखापरिक्षणातील विशेष अहवालावरुन दिसुन येत आहे.त्यामुळे संस्थेतील आर्थिक अपहार रु.19875218/- ( अक्षरी रुपये एक कोटी अठयान्नव लाख पंचाहत्तर हजार दोनशे अठरा मात्र ) या रकमेच्या आर्थिक नुकसानीची चौकशी होऊन संबधिताकडुन रकमा वसुल करणे आवश्यक आहे अशी माझी खात्री झाल्याने मी खालीप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

Scanned by CamScanner

# आदेश

मी प्रकाश गोविंद देवरे, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था ( आउयो ) कळवण जि.नाशिक, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 88 व नियम 1961 चे नियम 72 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कै.भिला दाजी पवार ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था म.या पतसंस्थेच्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमान्वये करण्यात आलेल्या सन 2014-15 ते 2015-16 या कालावधीचा लेखापरिक्षण अहवाल व उक्त नमुद कालावधीतील प्रशासकिय व अफरातफर विशेष अहवालातील गंभीर मुद्दे तसेच सोबतच्या परिशिष्ट अ मध्ये नमुद केलेल्या मुद्यांवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 88 व नियम 72 नुसार चौकशी करण्यासाठी श्री.अविनाश पांडुरंग खैरनार, सहकार अधिकारी ( प्र.श्रे.) अधिन सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (आउयो) कळवण यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्ती करित आहे.

प्राधिकृत अधिकारी यांनी प्रस्तुत आदेशात नमूद केलेल्या व्यवहारांमध्ये प्रस्तृत झालेल्या नुकसानीची व त्यांना मंजुर करण्यात येणा-या चौकशी फीचे संबधितांविरुध्द प्रमाण व जबाबदारी निश्चित करुन याबाबतचे ओदश या आदेशाचे तारखेपासुन तीन महिन्याचे कालावधीत पारित करावेत. प्राधिकृत चौकशी अधिकारी यांचे चौकशी कामकाजाचे मेहेनतान्याचे आदेश अलाहिदा पारित करण्यात येत आहेत.

सदरचा आदेश आज दिनांक 20/03/2017 रोजी माझे सही व शिक्क्यानिशी जारी केला आहे.

( प्रकाश गोविंद देवरे )
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था (आउयो) कळवण**

प्रति,
1. श्री. अविनाश पांडुरंग खैरनार, सहकार अधिकारी (प्रश्रे) कळवणतथा प्राधिकृत अधिकारी कै.भिलादाजी पवार ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था म.ता.कळवण जि.नाशिक
2/- त्यांना कळविण्यात येते कि, प्रस्तृत आदेशानुसार आपण चौकशीचे कामकाज तात्काळ सुरु करुन मुदतीत अहवाल सादर करावा.
2. चेअरमन/ व्यवस्थापक, कै.भिलादाजी पवार ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था म.ता.कळवण जि.नाशिक
2/- त्यांना सुचना देण्यात येते कि, चौकशीकामी प्राधिकृत अधिका-यास वेळोवेळी सर्व आवश्यक ते कागदपत्रे व दप्तर उपलब्ध करुन माहीती पुरवावी.

प्रत माहीतीसाठी सविनय सादर
1. मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, नाशिक विभाग नाशिक
2. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था,( लेखापरिक्षण ) नाशिक विभाग नाशिक
3. मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नाशिक
4. मा.जिल्हा विशेष लेखा परिक्षक वर्ग-1 सहकारी संस्था, नाशिक

**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था (आउयो) कळवण**

Scanned by CamScanner